# परिवहन महामंडळाकडील सेवक सेवेत असताना मयत झाल्यास सेवकाच्या वारसास तसेच सेवानिवृत्त / स्वेच्छानिवृत्त सेवकास मिळणाऱ्या सुविधा/फायदे व आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे

## १) महामंडळाकडील योजना

### ❖ अंत्यविधी मृत्युफंड

आवश्यक कागदपत्रे

१. रेशनिग कार्ड
२. सेवकाची शेवटची पगार स्लिप
३. मृत्यु दाखला/मृत्यू वार्ता
४. संबंधित डेपो/विभाग प्रमुखांचा नाव हजेरीपटावर असलेबाबतचा शेरा.
५. प्रा.फंड विभागाकडून कायदेशिर वारसाची पडताळणी करुन प्रकरण अंतिम करण्यात येते.
अंत्यविधी मृत्युफंड या योजनेअंतर्गत मयताच्या कायदेशीर वारसास रु.३०,०००/.अदा करणेत येतात.

### ❖ आदरांजली

१. आदरांजली योजनेचे समंतीपत्र भरलेले असणे आवश्यक आहे.
महामंडळाकडे पटावरील सभासद असणाऱ्या सभासदाकडून दरमहा प्रत्येकी रू. ५०/— वर्गणी कपात होते व त्यातून त्या महिन्यातील मयत सेवकांना विभागून समान रक्कम अदा करण्यात येते.
आदरांजली योजनेअंतर्गत कर्मचाऱ्याच्या वारसास अंदाजे रु.४ लाखापर्यंत रक्कम अदा करणेत येते.

### ❖ अपघाती निधन

१. कामावर असताना अपघाती मृत्यू झाल्यास (नैसर्गिक मृत्यू वगळता) रक्कम रू. २,००,०००/— मदत करणेची तरतुद आहे.

### ❖ शिल्लकी रजेचा पगार

१. सेवक सेवेत असताना ३६५ दिवस रजा साठवू शकतो. त्यास अनुसरून सेवक मयत / सेवानिवृत्त झाल्यास ३०० दिवसांपर्यंत रजेचा पगार अदा करणेची तरतूद आहे. सबब शिल्लकी रजेप्रमाणे शेवटच्या वेतनश्रेणीनुसार त्यास रजेचा पगार अदा केला जातो.

### ❖ ग्रॅज्युएटी / उपदान

१. महामंडळाचे नियमाप्रमाणे मयत / सेवानिवृत्त सेवक यांना ग्रॅज्युएटी (उपदान) अदा करण्यात येते. याकरिता महामंडळाकडे असलेली कागदपत्रे जसे सेवानोंदपुस्तक, कायदेशीर वारसाची नोंद ई.ची पडताळणी करणेत येवून नियमाप्रमाणे ग्रॅज्युएटी अदा करणेत येते.

## २) महामंडळाव्यतीरिक्त इतर योजना

❖ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ.

या योजनेअंतर्गत कर्मचा—याच्या वेतनातून वर्षातून दोनदा रु.१२ प्रति कर्मचारी कपात करुन त्यामध्ये खात्याचा रु.३६ अशी एकूण रु.४८ प्रति कर्मचारी कपात करणेत येवून महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे वेळेत पाठविणेत येतात. त्यामधून कर्मचा—यास खालील सुविधा प्राप्त होतात.

१) इ.१०वी व पुढील मुलांकरीता शिष्यवृत्ती. — रू. २०००/— ते रू. ५०००/— पर्यंतची वार्षिक शिष्यवृत्ती दिली जाते.

२) क्रिडा शिष्यवृत्ती.

| स्पर्धेचे स्वरूप | प्रथम | व्दितीय | तृतीय |
|---|---|---|---|
| राज्यस्तरीय | रू. ५०००/— | रू. ३०००/— | रू. २०००/— |
| राष्ट्रीय | रू. १००००/— | रू. ५०००/— | रू. ३०००/— |
| आंतरराष्ट्रीय | रू. १५०००/— | रू. १५०००/— | रू. १५०००/— |

३) परदेश उच्चशिक्षण शिष्यवृत्ती — पदवी परिक्षेत किमान ६० टक्के गुण असल्यास रू. ५००००/— रक्कम दिली जाते.

४) पाठयपुस्तक सहाय्यता — इयत्ता ११ वी च्या पुढे पूढील शिक्षणासाठी पाठयपुस्तक खरेदीवर ५० टक्के रक्कम अर्थसहाय्य म्हणून दिली जाते.

५) एम एस सी आय टी अर्थसहाय्य — एम एस सी आय टी परिक्षेत ६० टक्के पेक्षा अधिक गुणांसह उत्तीर्ण झाल्यास शासन मान्य शुल्कांच्या ५० टक्के रक्कम कामगार / कामगार पाल्यांना दिली जाते.

६) गुणवंत विदयार्थी गौरव — ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळाल्यास रू. ५०००/— रक्कम दिली जाते.

७) साहित्य प्रकाशन अनुदान — कामगार लेखकाने स्वलिखित साहित्य (कथा, कादंबरी, नाटक, काव्यसंग्रह आदी) प्रकाशित केल्यास रू. १००००/— रक्कम दिली जाते.

८) शिवण मशिन अनुदान योजना — प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कामगार किंवा कामगार कुटुंब महिलांना या योजनेअंतर्गत शिवण मशीन खरेदीसाठी ९० टक्के अनुदान दिले जाते.

९) गंभीर आजार उपचार अर्थसहाय्य — कामगार / कामगार कुटुंबियांना कर्करोग, हदयरोग, एडस्, क्षयरोग आदी दुर्धर आजाराच्या औषधोपचारासाठी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य दिले जाते.

| प्रत्यक्ष झालेला खर्च | मिळणारे अर्थसहाय्य |
|---|---|
| अ) रू. १०००० ते रू. २५०००/— | रू. ५०००/— |
| ब) रू. २५००१ ते रू. ५००००/— | रू. १००००/— |
| क) रू. ५०००१ ते रू. ७५०००/— | रू. १५०००/— |
| ड) रू. ७५००१ ते रू. १०००००/— | रू. २००००/— |
| ई) रू. १ लाखापेक्षा अधिक | रू. २५०००/— |

१०) प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना — कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार / कर्मचाऱ्यांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना लागू करण्यात येत आहे. विमा हप्त्याची प्रतिपूर्ती मंडळाकडून करण्यात येते. केंद्र शासनाच्या योजनेनुसार कामगारांना लाभ मिळेल.

११) आत्महत्या केलेल्या कर्मचा—याच्या कुटुंबाला अर्थसहाय्य — उद्योग / आस्थापना बंद पडून आर्थिक दुरावस्थेमुळे आत्महत्या केलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना रू. १ लाख अर्थसहाय्य देण्याची योजना आहे.

❖ भविष्य निर्वाह निधी — प्रॉ.फंड रक्कम व पेंशन योजना

आवश्यक कागदपत्रे.

१. सेवानिवृत्त / स्वेच्छानिवृत्त / मृत्यू / चा मूळ दाखल्याच्या तीन प्रती
२. सेवकाची पत्नी / मुलगा / मुलगी यांचे जन्म दिनांक
३. शाळेच्या दाखल्याच्या प्रत्येकी तीन झेरॉक्स प्रती
४. नॅशनल बॅंकेचे प्रत्येकाचे बॅंक खाते उघडणे व पासबुकच्या तीन झेरॉक्स आणणे.
५. पत्नी व मुलगा/मुलगी प्रत्येकी चार पासपोर्ट साईज फोटो देणे.
६. वारसाची नोंद नसल्यास सक्शेशन सर्टीफिकेटच्या तीन झेरॉक्स प्रत व मूळ प्रत.
७. १ रूपयाचे तीन रेव्हेन्यू स्टॅम्प
८. ऑफिस ऑर्डरच्या तीन प्रती
९. ज्या व्यक्तीच्या नावे फॉर्म भरावयाचे आहे त्यांचे पॅन कार्डच्या तीन झेरॉक्स प्रती.
१०. रेशनिंग कार्ड तीन झेरॉक्स प्रती.
११. एक साधी फाईल

**❖ समूह अपघात विमा योजना**

र.रु. १७५ वार्षिक प्रिमियममध्ये रु. १० लाखाचा विमा यामध्ये अपघात झालेनंतर कर्मचा—याचे अंशत: अथवा कायमस्वरुपी शरिराचे नुकसान झाल्यास त्याला टक्केवारीनुसार विमा रक्कम प्राप्त होईल.

❖ कर्मचाऱ्यांना ९० टक्के प्रमाणे महामंडळामार्फत हमीपत्र देवून पॅनेलवरील हॉस्पीटलकडून उपचार केले जातात.

१. चालू पगार स्लिप
२. मेडीकल कार्ड
३. रेशन कार्ड
४. हॉस्पीटलकडील कोटेशन

❖ प्रतिपूर्तीची देयके आरोग्य अधिकारी यांचे मान्यतेने अदा केले जाते.

१. चालू पगार स्लिप
२. मेडीकल कार्ड
३. रेशन कार्ड
४. फॉर्म भरून फाईल करून देणे.

Sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.